# उष्मांकांच्या माहितीमुळे आहारनियंत्रण

**पीटीआय, वॉशिंग्टन**

आरोग्य वार्ता

**उष्मांकांच्या (कॅलरी)** माहितीसह पुढे केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या चित्रांमुळे केवळ त्या पदार्थाचे आकर्षण कमी होते असे नाही, तर त्या पदार्थाला प्रतिसाद देण्याची मेंदूची प्रक्रियाही बदलते, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

'प्लोस वन' या पत्रिकेत याबाबतचा अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार, एखाद्या पदार्थात किती उष्मांक आहेत याचे विवरण त्या पदार्थाच्या चित्रासह दिल्यास त्या पदार्थाविषयी प्रोत्साहित करणारी मेंदूतील यंत्रणा कार्यान्वित होण्याचे प्रमाण कमी होते. याउलट तो पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीची यंत्रणा अधिक प्रमाणात कार्यरत होते. याचाच अर्थ एरवी जो पदार्थ खाण्याची तुमची इच्छा होते, त्याच्यातील उष्मांकांची माहिती वाचताच तो तुम्हाला खाण्यास कमी योग्य वाटू लागतो, असे संशोधकांनी सांगितले.

उष्मांकांविषयी माहिती दिल्यावर तुमचा मेंदू खाद्यपदार्थांची कशी निवड करतो, याचा शोध घेणारा हा पहिलाच अभ्यास असल्याचा या संशोधकांचा दावा आहे.

याबाबत स्टॅनफोर्ड विद्यापीठातील डॉक्टरेटोत्तर विद्यार्थी ॲन्ड्रिया कोर्टनी यांनी सांगितले की, खाद्यपदार्थांसोबत त्यांच्यातील उष्मांकांबाबत पत्रक दिल्याने त्यांच्या निवडीबाबत विचार करताना मेंदूच्या प्रोत्साहनात्मक प्रक्रियेत बदल होतो, असे आमच्या अभ्यासातून दिसून येत आहे. हा अभ्यास केला जात असताना ॲन्ड्रिया अमेरिकेतील डार्टमाउथ महाविद्यालयात पदवीच्या विद्यार्थी होत्या. पोषक आहाराच्या योजनांत संबंधित व्यक्तीचा खाद्यपदार्थांविषयीचा कल लक्षात घेतल्यास त्या यशस्वी होण्याची अधिक शक्यता असते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या अभ्यासात १८ ते २२ वर्षे वयोगटातील ४२ पदवीपूर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना १८० खाद्यपदार्थांच्या प्रतिमा आधी उष्मांकांच्या माहितीशिवाय आणि नंतर उष्मांकांच्या माहितीसह दाखविण्यात आल्या. त्या वेळी हे पदार्थ खाण्याची त्यांची किती इच्छा आहे, हे विचारण्यात आले. या वेळी 'फंक्शनल मॅग्नेटिक रेसोनन्स इमेजिंग स्कॅनर'चा वापर करण्यात आला.




Natural Internal Body Coolant
शारंगधर
शारंगधर कूलकंद ग्रॅन्युल्स
अंदरकी और बाहरकी गरमी हो जाएगी गुल...
उष्णतेचे विकार, डोळ्यांची आणि हातापायांची जळजळ, ॲसिडीटी (पित्त) यावर वर्षभर उपयोगी
100 % नैसर्गिक
To know more & buy online Scan QR Code With your mobile phone
● सर्व प्रमुख औषधी दुकानात उपलब्ध ● Buy Online : www.sharangdhar.com



लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हल

# 'मासुंदा' काठावर मस्ती बँडची धमाल

## वैशाली सामंतच्या सुरावटींवर ठाणेकर थिरकले




**प्रतिनिधी, ठाणे**

**फोक मस्ती** बँडचे दर्जेदार सादरीकरण आणि सुप्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांच्या गाण्यांनी शनिवारी सायंकाळी 'लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हल'ला सांस्कृतिक उंचीवर नेऊन ठेवले. प्रसिद्ध मासुंदा तलावाच्या काठावर रंगलेल्या या कार्यक्रमाचा ठाणेकर रसिकांनी मनमुराद आनंद लुटला.

या फेस्टिव्हलमधील प्रश्नमंजूषा स्पर्धेत सहभागी होऊन अनेक ठाणेकरांनी गिफ्ट कूपन जिंकल्या. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मासुंदा तलावाचा परिसर गर्दीने फुलून गेला होता. या फेस्टिव्हलमध्ये विपुल पांचाल, सचिन गुलदगडे, रोशन आडे, अमय चोपा आणि प्रिन्स मँगन या तरुणांनी फोक बँडचे सादरीकरण केले. आमची मुंबई, लाइफ इज क्रेझी, तंतर मंतर, माया रे लागी आदी गाण्यांचे सादरीकरण फोक बँडने केले. त्यांच्या गाण्यांवर रसिक थिरकत होते.

या कार्यक्रमात वैशाली सामंत यांनी ऐका दाजिबा, ढिपारी ढिपांग आदी गाणी सादर केली. कुणाल रेगे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. रिजन्सी ग्रुप प्रस्तुत लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हल १७ फेब्रुवारीपर्यंत आहे. त्यात दररोज निवडल्या जाणाऱ्या भाग्यवान विजेत्यांना एक ग्रॅम सोन्याची आणि चांदीची नाणी, एलईडी टीव्ही, वॉशिंग मशीन, वातानुकूलन यंत्र आणि रेफ्रिजरेटर यांसारख्या आकर्षक भेटवस्तू देण्यात येत आहेत. फेस्टिव्हलच्या अखेरीस भाग्यवान विजेत्यांची निवड करण्यात येणार असून पहिल्या भाग्यवान विजेत्यास कार आणि दुसऱ्या भाग्यवान विजेत्याला सहलीचे पॅकेज देऊन गौरवण्यात येणार आहेत.





'लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हल'च्या निमित्ताने शनिवारी ठाण्यात फोक मस्ती बँडचे सादरीकरण आणि गायिका वैशाली सामंत यांच्या गाण्यांचा ठाणेकर रसिकांनी आंनद लुटला. (छायाः दीपक जोशी)

### आज 'जीवनगाणी'



सिद्धार्थ जाधव

लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हलमधील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांना आज, रविवारी जीवनगाणी कार्यक्रमात जुन्या-नव्या गाण्यांच्या मैफलीचा आनंद लुटता येईल. या कार्यक्रमात चिंतामणी सोहनी आणि अपर्णा नागरगट्टे गाणार आहेत. या कार्यक्रमास सुप्रसिद्ध अभिनेता सिद्धार्थ जाधवही उपस्थित राहणार आहे.

| कधी? | कुठे? |
|---|---|
| आज, १० फेब्रुवारी, वेळ - सायंकाळी ६.३० ते ९. | गणेश विसर्जन घाट, साईकृपा हॉटेलसमोर, मासुंदा तलाव, ठाणे (प) |

### प्रायोजक

रिजन्सी ग्रुप प्रस्तुत 'लोकसत्ता ठाणे शॉपिंग फेस्टिव्हल' हा पितांबरी आणि ठाणे महापालिका यांच्या सहकार्याने होत आहे. ईशा टुर्स हे या शॉपिंग फेस्टीव्हलचे ट्रॅव्हल पार्टनर आहेत. टिजेएसबी हे बँकींग पार्टनर आहेत. वास्तू रविराज, ऑर्बिट, चिंतामणी ज्वेलर्स, जीन्स जंक्शन, मिलसेन्ट आणि टिप टॉप प्लाझा हे असोसिएट पार्टनर आहेत. डिजी ठाणे हे या खरेदी उत्सवाचे डिजीटल पार्टनर आहेत. तसेच तन्वीशता, अनंत हलवाई, हॅलो प्रवासी, रांका ज्वेलर्स, कृष्णा स्वीट आणि लीनन क्लब हे पॉवर्ड बाय प्रायोजक आहेत. वामन हरी पेठे सन्स, शुभकन्या, गडकरी कट्टा आणि कुलस्वामिनी साडी हे प्लॅटीनम पार्टनर आहेत. तर सरलाज स्पा अँड सलोन, कलामंदीर आणि एनरिच सलोन हे गिफ्ट पार्टनर आहेत. लँन्डमार्क मर्सिडीज हे लक्झरी कार पार्टनर आहेत. प्रॉम्पक्राफ्ट हे प्लॅटिनम पार्टनर असून ब्रम्हविद्या हे हिलींग पार्टनर आहेत.

### सहभागासाठी

- लोकसत्ता ठाणे शॉपिंग महोत्सवात सहभागी दुकानात खरेदी करणाऱ्या ग्राहकांना या बक्षिसांची संधी मिळू शकेल.
- सहभागी दुकानांमध्ये ३०० रुपयांपेक्षा अधिक खरेदी करणाऱ्या ग्राहकांना बिल दिल्यानंतर दुकानदारांकडून त्यांना एक कूपन दिले जाईल.
- ते कूपन भरून दुकानात असलेल्या 'लोकसत्ता'च्या ड्रॉप बॉक्समध्ये टाकायचे आहे.
- अर्धवट माहिती भरलेली कूपन्स फेटाळले जातील.
- 'ड्रॉपबॉक्स'मध्ये दररोज जमा होणाऱ्या कूपन्समधून दररोज भाग्यवान विजेत्यांची निवड केली जाईल आणि त्याचे नाव 'लोकसत्ता ठाणे' आणि 'लोकसत्ता महामुंबई'मधून प्रसिद्ध केले जाईल.
- या स्पर्धेकरिता नियम आणि अटी लागू असतील.

# महाराष्ट्र सर्वांत कमी धूम्रपान करणारे राज्य

**प्रतिनिधी, मुंबई**

**'ग्लोबल ॲडल्ट** टोबॅको सर्व्हे'च्या पाहणीतील निष्कर्षानुसार देशभरात महाराष्ट्र हे धूम्रपानाचे सर्वात कमी प्रमाण असणारे राज्य आहे. 'तंबाखूमुक्त शाळा' अभियानांतर्गत आतापर्यंत २ हजार ७५५ शाळा तंबाखूमुक्त झाल्या आहेत.

सलाम बॉम्बे फाऊंडेशन, संबंध हेल्थ फाऊंडेशन, टाटा रुग्णालय यांच्या सहकार्याने राज्यात तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबवला जात आहे. 'ग्लोबल ॲडल्ट सर्व्हे'२०१६-१७ नुसार महाराष्ट्रात धूम्रपानात २.१ टक्क्याने आणि धूम्रविरहित तंबाखू सेवनात ३.१ टक्क्याने घट झाल्याचे आढळून आले आहे. सध्या राज्यातील धूम्रपानाचे प्रमाण ३.८ असून ते इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणीनुसार राज्यात २००५-०६ साली तंबाखू सेवनाचे प्रमाण स्त्रियांमध्ये १०.५ तर पुरुषांमध्ये ४८.३ होते. हे प्रमाण २०१५-१६ साली अनुक्रमे ५.८ आणि ३६.६ टक्क्यांवर आले आहे. जिल्हा स्तरावर ३०९ तंबाखू मुक्ती केंद्रांतून तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत समुपदेशन केले जाते. डिसेंबर २०१८ अखेर समुपदेश केलेल्या १ लाख ४२ हजार जणांपैकी ६,३२४ जणांनी तंबाखू सेवन बंद केले आहे. तसेच ८०४ आरोग्य संस्था तंबाखूमुक्त करण्यात आल्या आहेत. 'कोटपा' कायद्यांतर्गत डिसेंबर २०१८ अखेर राज्यात १५,३९,१७४ रुपये एवढा दंड वसूल केला आहे. स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यामुळे तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचा प्रभाव दिसत असल्याचे आरोग्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

# 'सिनेमॅटोग्राफर' निर्मल जानी यांचे निधन

**प्रतिनिधी, मुंबई**

**'पत्थर के** फूल', 'हकीकत', 'बॉर्डर', 'प्यार तो होना ही था', 'राजू चाचा' यांसारखे हिंदी चित्रपट आणि 'राजा शिवछत्रपती', 'स्वराज्यरक्षक संभाजी' यांसारख्या मालिकांसाठी सिनेमॅटोग्राफी करणारे प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर निर्मल जानी यांचे शनिवारी सकाळी मुंबईत हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

निर्मल जानी सिनेमॅटोग्राफी करत असलेली 'स्वराज्यरक्षक संभाजी' ही मालिका सध्या चांगलीच लोकप्रिय आहे. निर्मल जानी यांनी 'पत्थर के फूल' चित्रपटापासून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 'जख्म', 'बॉर्डर', 'हद कर दी आपने', 'दुश्मन', 'प्यार तो होना ही था', 'राजू चाचा', 'हॅट्ट्रीक', 'रक्त', 'कुछ खट्टी, कुछ मिठी' अशा हिट चित्रपटांची सिनेमॅटोग्राफी केली. दूरचित्रवाणीवर गाजलेल्या 'शक्तिमान' या मालिकेची सिनेमॅटोग्राफीही निर्मल यांचीच होती.

त्यांच्या सध्या सुरू असलेल्या स्वराज्यरक्षक मालिकेत संभाजी महाराजांची भूमिका साकारणारे अभिनेते आणि निर्माते अमोल कोल्हे यांनी त्यांच्याविषयीच्या आठवणी जागवताना त्यांच्याविषयी माहिती दिली. ते माझ्यासाठी मित्र आणि मार्गदर्शक होते. स्वराज्यरक्षक मालिका उभी करण्यात आणि निर्मितीला पाठिंबा देणाऱ्यांमध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. ते सेटवर सगळ्या वयोगटांतील लोकांसोबत मिसळत. प्रत्येक फ्रेम खुलवण्याकडे ते कटाक्षाने लक्ष द्यायचे. त्यांच्यासोबतच्या अनेक आठवणी आहेत, पण हा आमच्या सगळ्यांसाठी धक्का आहे, असे कोल्हे यांनी म्हटले.

Fortune EDIBLE OILS & FOODS
adani wilmar
खाद्यतेल आणि फूड्स लीडर सोबत भागीदारी करा.



फॉर्चून फूड्स: वितरक पाहिजेत
मुंबई, बृहन्मुंबई, पुणे, कोल्हापूर आणि महाराष्ट्रातील इतर मोठ्या शहरात
अदानी विल्मार हा अदानी ग्रुप प्रायव्हेट इन्फ्रास्ट्रक्चरचे लीडर आणि विल्मार इंटरनॅशनल लिमिटेड-सिंगापूर ह्या अशियातील मोठ्या ॲग्री बिझनेस ग्रुपमधील 50:50 संलग्न उपक्रम आहे. अदानी विल्मारची विकासाची मोठी महत्त्वाकांक्षा आहे. म्हणून आम्ही वितरक भागीदार शोधत आहोत. आमचे एफएमसीजी, स्टॅपल्स, स्पेशालिटी फॅट्स, ओलिओ केमिकल्स असे प्रॉडक्ट्स जनरल ट्रेड, मॉडर्न ट्रेड, हॉरेका आणि बी 2 बी अशा विविध चॅनल्समध्ये आहेत.
संपूर्ण भारतातील उलाढाल: ₹27,000 कोटी
उद्योगातील अग्रेसर विकास: खाद्यतेलात नं. 1
प्रॉडक्टची मोठी श्रेणी: खाद्यतेल, तांदूळ, आटा, डाळ, बेसन, सोया चंक्स, स्पेशालिटी फॅट्स, ओलिओ केमिकल्स आणि कॅस्टर.
तुमच्याकडून हवा असलेला तपशील
व्यवसायाची सध्याची पार्श्वभूमी
वाहन आणि मनुष्यबळाचा तपशील
वितरणाचा विभाग
गोडाउन स्पेस
कव्हर केलेल्या रिटेल आउटलेट्सची संख्या
वरील तपशील पाठवा येथे distributionGTM@adaniwilmar.in
टोल-फ्री नं. 1800 233 9999 (सकाळी 10 ते सायंकाळी 6, आठवड्याच्या दिवशी)
Adani Wilmar Limited
Corporate Office:
"Fortune House", Near Navrangpura Railway Crossing, Ahmedabad - 380009, Gujarat, India.
Visit us at www.adaniwilmar.com
Great Place To Work. Best Workplaces in Manufacturing INDIA 2019

TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Office:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.१२.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१८ रोजी संपलेले नऊ महिने | ३१.१२.२०१७ रोजी संपलेले नऊ महिने | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | १७,१७३.८७ | १७,९०२.०४ | १५,५९५.७८ | ५१,४८१.३७ | ४४,२३८.४३ | ६०,५१९.३७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३,५१३.६३ | ५,०४३.७५ | ३,२२६.२५ | १२,४६५.२४ | ६,६४१.२७ | १०,००४.५४ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ३,७७३.३० | ५,०१५.५६ | २,११०.८० | १२,३६२.०३ | ४,८८२.३८ | ६,६३८.२५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | २,४५६.०९ | ३,२६७.८६ | १,३३८.०९ | ८,०४२.१० | ३,१३८.६२ | ४,१६९.५५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | २,३५१.१५ | ३,२६१.३६ | १,४७४.२० | ७,९५३.१३ | ३,०६४.६४ | ४,१०८.४३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४६.१२ | १,१४६.१२ | ९७१.४१ | १,१४६.१२ | ९७१.४१ | १,१४६.१२ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | ६०,३६८.७२ |
| प्रत्येकी रु. १०/ चे मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांमध्ये (अपवादात्मक बाबींनंतर) | २१.०५ | २८.१४ | १२.५५ | ६९.०४ | २९.१८ | ३८.५७ |
| प्रत्येकी रु. १०/ चे सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांमध्ये (अपवादात्मक बाबींनंतर) | २१.०५ | २८.१३ | १२.५५ | ६९.०३ | २९.१८ | ३८.५६ |

**३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.१२.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१८ रोजी संपलेले नऊ महिने | ३१.१२.२०१७ रोजी संपलेले नऊ महिने | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ४१,२१९.९१ | ४३,५४४.१० | ३३,४४६.६० | १२२,५९६.८० | ९६,८८४.०७ | १३३,०१६.३७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३,११९.३३ | ५,२८४.२८ | ३,२१०.२८ | ११,७८७.६० | ७,६७१.२९ | ११,५१०.६३ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ३,१५१.७४ | ५,४४८.०५ | २,०९४.७० | ११,६४०.२० | ५,८९४.२७ | २१,१०९.७५ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १,७५१.१९ | ३,१२१.६८ | १,१४३.८८ | ६,८०९.६३ | ३,०६४.९५ | १७,७०४.३६ |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १.८८ | (५.४८) | (७.९६) | (६.५६) | ९.८४ | ५८.४५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | १,९२५.२८ | १,३०५.४५ | १,३२५.०१ | ६,९११.७५ | (४,५१२.३९) | १४,६८४.८० |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४४.९४ | १,१४४.९३ | ९७०.२४ | १,१४४.९४ | ९७०.२४ | १,१४४.९५ |
| राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | | | ५८,३८७.१९ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | १९.५७ | ३१.११ | १२.१५ | ६७.३७ | २९.७१ | १२७.५६ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | १९.५७ | ३१.१० | १२.१५ | ६७.३६ | २९.७१ | १२७.५४ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | १९.५८ | ३१.०७ | १२.०७ | ६७.३१ | २९.८० | १२८.१२ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | १९.५८ | ३१.०६ | १२.०७ | ६७.३० | २९.८० | १२८.१० |

**टिपा :**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) ०१ जुलै, २०१७ पासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यानंतर प्रवर्तनातून महसुलाची माहिती जीएसटीच्या निव्वळ दिली आहे. त्यानुसार ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी प्रवर्तनातून महसूल निष्कर्षांत सादर केलेल्या मागील कालावधीशी तुलनायोग्य नाही.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई : ०८ फेब्रुवारी, २०१९

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL